—: जाहिरात :—

जाहिरात क्रमांक १/२०१३   पोलीस आयुक्त कार्या.   दिनांक :— ०५/०२/२०१३

महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र.अेपीओ—३१०६/प्रक्र.२२७/पोल—३, दिनांक २१.८.२००६ व शासन निर्णय गृह विभाग क्र.एसपीपी २००५/प्रक्र. २४७/पोल—१० दि १५.९.२००६ अन्वये पोलीसांकडून दाखल होणारे खटले विधीवत दाखल व्हावेत, गुन्हेगारांना शासन होऊन कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम व्हावी, तसेच पोलीस प्रशिक्षण संस्थामध्ये पोलीसांना कायदेविषयक प्रशिक्षण देणे सुलभ व्हावे म्हणून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर विधीविषयक अधिका—यांची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. त्यापैकी पोलीस आयुक्त नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर ***विधी अधिकारी गट 'ब' यांची ०२ पदे व विधी अधिकारी यांचे ०४ पदे*** मंजुर करण्यात आलेली आहेत. त्यापैकी रिक्त असलेले विधी अधिकारी गट 'ब' यांची ०२ पदे व विधी अधिकारी यांची ०३ पदे अशी एकुण ०५ रिक्त पदे भरण्याची असल्याने, खालील अटी व शर्ती पूर्ण करण्या—या उमेदवारांनी सदर पदाकरीता जाहिरातीत दिलेल्या नमुना फॉर्ममध्ये विनंती अर्ज दिनांक ०१/०३/२०१३ रोजी पर्यंत पोलीस आयुक्तालय कार्यालय, सीबीडी बेलापुर, सेक्टर १०, नवी मुंबई येथे पोहचेल अशा बेताने पाठवावेत. तद्नंतर प्राप्त झालेले विनंती अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## करारातील मासिक देय रक्कम

अ) विधी अधिकारी गट 'ब' या पदाकरीता एकत्रीत अनुज्ञेय मासीक देय रक्कम रूपये १५,०००/— आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रूपये ५०००/— असे एकुण २०,०००/— दरमहा देय राहील. (उपरनिर्देष्ठ मर्यादिपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

ब) विधी अधिकारी या पदाकरीता एकत्रीत अनुज्ञेय मासीक देय रक्कम रूपये १२,०००/— आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रूपये ३०००/— असे एकुण १५,०००/— दरमहा देय राहील. (उपरनिर्देष्ठ मर्यादिपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

## शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा अनुभव

१) **शैक्षणिक अर्हता** :— उमेदवार मान्यताप्राप्त विदयापिठाचा कायदयाचा पदवीधर असेल व तो सनदधारक असेल.

२) **वयोमर्यादा** :— विधी अधिकारी गट 'ब' व विधी अधिकारी या पदाकरीता उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसावे. (उमेदवार दिनांक ३१/१२/१९५२ पुर्वी जन्मलेला नसावा.)

३) जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायदयाविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा.सर्वाच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तींची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

४) **अनुभव** :— विधी अधिकारी गट 'ब' व विधी अधिकारी या पदांसाठी वकील व्यवसायाची किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

५) उमेदवार गुन्हेगारी विषय, सेवाविषयक प्रशासनीक अशा सर्व प्रकारच्या कायदयांची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञान संपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

६) उमेदवारांस मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

## कर्तव्य व जबाबदा—या

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा—या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलांकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधीत अधिका—यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथ पत्राचा मसुदा तयार करणे व त्यास समक्ष प्राधीका—याची मान्यता घेवून न्यायालय विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे. अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबधीत सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे .

## अटी व शर्ती

१) सदर पदाची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी/अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर नेमणूका हया करार पध्दतीने ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा ११ महिन्याकरीता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे. असे सक्षम प्राधीका—याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायांशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधीकरणाच्या लेखी परवानगीशिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधीका—याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) उमेदवाराची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

५) मुलाखतीलचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल

६) उमेदवाराला कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

७) नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (ॲग्रीमेंट) भरणे अनिवार्य राहील.

८) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा—या अधिकारी / कर्मचा—यांना एकत्रीत वेतन आणि अनुज्ञेय व दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता (उपरनिर्देष्ठ मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेयहोणार नाहीत.

९) उमेदवाराने वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक ३१/१२/२०१२ अखेर पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

१०) अर्जासोबत २.५ X २.५ सेमी आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत. तसेच पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

११) सदर पदाकरीता निवड होणा—या उमेदवारास कायदेविषयक सल्ला देण्यासाठी कमीत कमी ३० तासांचा कालावधी देणे बंधनकारक राहील.

१२) सदरील विधी अधिकारी यांच्या नेमणुका या मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचिका क्र. १९००८/१९००९ महाराष्ट्र शासन व इतर विरूध्द अनिता आणि इतर व विशेष हक्क याचिका क्र २०१८२/१२ श्री. नारायण तुकारामपंत जोशी आणि इतर विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये दिनांक ०२/११/२०१२ रोजी निर्गमित केलेल अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने अंतिम करारातील अधीन राहून असतील.

ooooooo

# —: जाहिरात :—

## पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

पोलीस आयुक्त नवी मुंबई यांच्या आस्थापनेवरील विधी अधिकारी वर्ग ब यांची ०२ पदे तसेच विधी अधिकारी यांची ०३ रिक्त पदे भरणेकामी इच्छूक कायदयाची पदवी धारक व विहीत अटी पूर्ण करणा—या उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

अर्जाचा नमुना आणि विहीत अटी या बाबतची माहिती मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. विहीत नमुन्यातील अर्ज पोलीस आयुक्त नवी मुंबई यांच्या कार्यालयातील ( CFC ) शाखा येथे विक्रीस ठेवण्यात आलेले आहे, तसेच अर्ज विक्रीची अंतीम तारीख ०१/०३/२०१३ आहे.

सदर अर्जाची किंमत खुल्या वर्गाकरीता रक्कम रूपये ३००/— व मागासवर्गाकरीता रक्कम रूपये २००/— ठेवण्यात आलेली आहे. पोलीस आयुक्त नवी मुंबई यांच्या कार्यालयात प्राप्त होण्याची अंतिम तारीख ०५/०३/२०१३ अशी आहे.

( अशोक शर्मा )
पोलीस आयुक्त नवी मुंबई

# अर्जाचा नमुना

विधी अधिकारी 'गट —ब' / विधी अधिकारी पदाकरिता अर्ज

नियुक्तीचे इच्छुक ठिकाण :— ______________________________.

| | |
|---|---|
| कार्यालयीन उपयोगासाठी<br>१.अर्ज क्रमांक :— [ ]<br>२.अर्ज स्विकारल्याचा दिनांक [ ]<br>३.अर्ज स्विकारणा—याची स्वाक्षरी (दिनांकासह) :— | एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा. |

**सुचना** : अर्जदाराने अर्जव अर्जातील अंक मराठीत लिहावेत.

## अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती

१. अर्जदाराचे पुर्ण नाव : आडनाव नाव वडिलांचे/पतीचे नाव

मराठीत :—

इंग्रजीत :—

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :

तालुका जिल्हा पिन कोड

३.कायमचा पत्ता :

तालुका जिल्हा पिन कोड

४. **दुरध्वनी क्रमांक** : लॅन्डलाईन______________. मोबाईल क्र

५. **जन्मदिनांक** : ______________________. जन्मस्थळ :

दिवस महिना वर्ष

६. **दिनांक : ३१/१२/२०१२ रोजीचे वय** :

दिवस महिना वर्ष

७. **लिंग** : पुरूष __________/ महिला

८. धर्म : ______________________________ जात :

९. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? : होय ________ /नाही _______.

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

१०. शैक्षणीक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विदयालय/ महाविदयालय) | बोर्ड / विदयापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी) अथवा जूनी ११ वी परिक्षा | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२ वी) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

११. इतर शैक्षणिक अर्हता :
संगणक प्रशिक्षीत आहे काय ? होय __________ / नाही __________.

१२. अर्जदाराची इतर माहिती
अ) सनद घेतल्याचा दिनांक ______________________________.
ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील

| अक्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

**टिप** : वकिली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१३–अ अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात /दंड करण्यात/सिध्दोशी ठरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परिक्षांना/निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विदयापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक प्राधिकरणाकडून/संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/काढून टाकण्यात आले आहे. काय ? होय ____________/नाही __________.

१३—ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापिठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ?
होय____________/नाही ___________.

(१३—अ किंवा १३—ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.

**अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.**

मी श्री./सौ./कु.

याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड /नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतची माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :—

दिनांक :—

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकीत प्रती.